स्वकुळ समाचार

वर्ष-६ अंक-१४ ठाणे फेब्रुवारी २०२१ पाने-३८ वर्गणी ₹.३००

श्री व सौ.अश्विनी भरत मते
यांच्या अथक प्रयत्नातुन साकारले
महिला सबलीकरण व आत्मनिर्भर
उदयोजगता ऊपकरणे वाटप समारंभ

शिव जयंती च्या
हार्दिक शुभेच्छा

BHIM UPI

Thane zilla swakul sali samaj

Q82346331

भाद्रपद गणपती
जयंती उत्सव

माता अंकिनी-दुशांकिनी
विवाह-सोहळा

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

७५ वा वाढदिवस

दि. २/३/२०२१

स्वकुळ वैभव

श्री. डी. जी. निमकर

(मोबा. ९८२०३२८३७६)

७२ वा वाढदिवस

दि. ८/२/२०२१

सौ. दिपश्री डी. निमकर

(मोबा. ७५०६०४६७७९)

डी जी निमकर यांना (उभयतांना) वाढदिवसा' च्या हार्दिक शुभेच्छा!
जी जी परममंगळधामा । सकळ देवदेवोत्तमा ।
नि वडिले निरवधि । नवनीत हे ॥
म ज हृदयी सद्गुरु । जेणे तारिलो हा संसारपूरु ॥
क रूनी घ्यावे हे तुमते । विनवितु असे ॥
र चिली धर्मनिधाने । श्री निवृत्तीदेवे ॥
यां शोध्यता तरी विनवू बिहो । तरी आन उपायो नाही ॥
ना ना श्रीकृष्ण कोकिळु । अर्जुन वसंतु ॥
वा रिके घेऊनि दिधले । कामधेनूते ॥
पु ढ ती तो घनाकारु हारपे । जे वेळी अळंकारे होती ॥
दि से तेणे माने रूढला । साधकदशे ।
व ळण घेऊनि आले । सेजे तैसे ॥
सा हित्य सोनियाच्या खाणी । उघडवी देशियेविया श्रोणी ।
च्या खूप खूप हार्दिक हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक :-

श्री. लक्ष्मीकांत	सौ. उमा	/	कुमारी ऋत्वा
श्री. राहूल	सौ. सपना	/	कु. साक्षी कु. प्रज्ञा
श्री. केदार	सौ. विनिता	/	कुमारी गौरी

तसेच,
श्री दत्तमंदिर देवस्थान मंडळ कुडली (तरीबंदर) स्वकुळ साळी समाज, ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज स्वकुळ साळी ज्ञातिगृह, श्रीक्षेत्र आळंदी अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज आणि जागतिक साळी फाउंडेशन.
माजी संपादक श्री. डी. जी. निमकर यांना 'स्वकुळ समाचार'कडून अमृतमहोत्सवी वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

२० फेब्रुवारी

लायन चंद्रकांत आत्माराम हावरे

संस्थापक अध्यक्षः लायन्स क्लब ऑफ कांजुरविक्रोळी
डिस्ट्रीक चेअरमन - लायन इंटरनॅशनल (डिस्ट्रीक ३२३१ए २)
अध्यक्ष- स्वकुळ साळी ज्ञातिगृह, आळंदी
सदस्य - अखिल भारत स्वकुळ साळी समाज
मुख्यसल्लागार - रायगड जिल्हा स्वकुळ साळी सेवा मंडळ, मुंबई
सल्लागार - श्री गणेश मंदिर ट्रस्ट, रानवली
स्वकुळ साळी समाज मठ पंढरपुर -डेव्हलपमेंट कमिटी सदस्य

शुभेच्छुक : डॉ. प्रज्ञा हावरे (नरे), श्रीमती स्वाती राहूल हावरे, चि.सोहान, कु. सारा
पत्ता: बी/६०७, जीवनविहार सोसायटी, कोपरकर रोड, नाहूर (पूर्व), मुंबई - ४२.
फोन : २५६६७५५५ / ९८६९१७३२७५

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

२१ फेब्रुवारी

श्री. सोमनाथ रतिलाल कासटकर

B.Com., G.D.C. & A., L.G.S.

मो.: ९८२०८२१७२६

Email: somnath.kasatkar55@gmail.com

अध्यक्ष : श्री सूर्यवंशी समस्त स्वकुळ साळी समाज मंडळ (महासभा) एरंडोल
सल्लागार: ठा. जि. स्व. सा. समाज आणि श्री गणेश मंदिर ट्रस्ट रानवली

कै. नेमिचंद सोनू साळी व कै. यमुनाबाई नेमिचंद साळी यांच्या स्मरणार्थ श्री. भालचंद्र ने. साळी व श्री. संजय ने. साळी (डोंबिवली) यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

कै. दत्तात्रय सदाशिव आमते यांच्या स्मरणार्थ त्यांचे पुत्र श्री.लक्ष्मीकांत दत्तात्रय आमते व श्री. गणेश दत्तात्रय आमते यांच्या सौजन्याने पृष्ठदान

अखिल भारत स्वकुळ साळी समाज मान्यताप्राप्त
अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज मान्यताप्राप्त
ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संचालित
नोंदणी क्र. ई/९२८/ठाणे दि. १७/५/८८

स्वकुळ समाचार

RNI No. MAHMAR/2014/57230

❖ नविन सभासद २००० रुपये (१५ वर्षाकरिता)
१५०० रुपये (१० वर्षाकरिता)
१००० रुपये (५ वर्षाकरिता)
❖ उपवरवधू नोंदणी (प्रत्येक अंकासाठी) रु. ७५/- व फोटोसह रु. १५०/-
❖ उपवरवधू नोंदणी सलग वर्षभर रु. ७५०/- व फोटोसह रु. १५००/-
❖ विश्वस्तनिधी १५०१/- रु. ❖ आधारस्तंभ १५०१/- रु. ❖ पृष्ठदान १५००१/- रु.
❖ मंगलनिधी ५०१/- रु.

स्वकुळ समाचार या नावाने डोंबिवली नागरी सहकारी बँक मधील आमच्या खात्यावर पैसे भरलेल्या पावतीसह आपल्या सर्व प्रकारचे लिखित साहित्य किंवा मजकूर आपण ई मेलवरही पाठवू शकता

You can transfer your Amount to SWAKUL-SAMACHAR from any bank
Favouring : Swakul Samachar
Bank Name : Dombivli Nagari Sahakari Bank.
Branch : Nandivli
IFCS CODE : DNSB0000009
Saving A/c No. 009010100002199
email
sampadakswakulsamachar@gmail.com

कार्यालय: फ्लॅट नं. ०१, साईसेवा नं. २ को. ऑप. हौ. सोसा., जन. अरुण कुमार वैद्य चौक, गांधीनगर, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व) जि. ठाणे ४२१२०१

अध्यक्ष: श्री. विनोद वसंतराव सजगुले
रुम नं. १४७, साई नगरी समोर, मीठबंदर रोड,
डॉ. कोळी क्लिनीकच्या बाजूला, चेंदणी कोळीवाडा, ठाणे (पूर्व)
पिन-४००६०३ मोबा.: ९८९२३९३३७१/०२२-२५३२८९६३

सचिव: श्री. राजेश शंकरराव साळी, ९९६७५८४०३२

सहसचिव: सौ. शैलजा सोमनाथ कासटकर, ९८२०१४५४५१

उपाध्यक्ष: श्री. प्रकाश वासुदेव पावले, ८८०६९८७५६४

कोषाध्यक्ष: श्री. ईश्वरलाल एकनाथ फंड, ८६५२२१५१६३

अंतर्गत हिशोब तपासणीस: बारसु सिताफळे, ९३२६१८२४३५

आर्थिक सल्लागार: श्री. नितीन ढवण(सीए) ९८२२४५६७६६

सल्लागार: श्री. भालचंद्र नेमिचंद साळी, ९७०२६४४२३२
श्री. सोमनाथ रतिलाल कासटकर, ९८२०८२१७२६
डॉ. किसनराव जगन्नाथ जेधे, ९८३३८२०६०१
श्री. बाळकृष्ण ओंकार आढाव, ९७५७०८६९१५

संपादक : श्री. गोपाळ सुकलाल थोरात
घरकुल हौ. सोसा., रुम नं.५१७७, मारुती मंदिराजवळ,
शिवाजी नगर, अंबरनाथ (पूर्व) ४२१५०१ मो.: ७७०९३१५४९८
सहसंपादक : श्री. अविनाश शंकर धोत्रे, ९५०३३१२५६६
सहसंपादक: श्री. रमेश विष्णुदास बारगजे, ९८६९४८३६००
संपादक मंडळ: श्री. पुरुषोत्तम जगन्नाथ साळी,८४२१९१०४३७
श्री. शशिकांत डहाके, ९८९२०२३७६३

तांत्रिक समिती: श्री. उदयकुमार साळी,९३२३३८६१३९
(DCE, B.Tech, Civil)
तांत्रिक सल्लागार, सामान्य प्रशासन, ठाणे जिल्हा
वेब डिझायनर: श्री. बाळकृष्ण साळी, सुरत ९०३३६०३६१३
सदस्य: श्री. राजेश जगन्नाथ साळी, ९२०९२०३६९६
श्री. पंकज अरुण दिवटे, ९८२०८८२२८९

कायदेशीर सल्लागार: ॲड. श्री. गजानन सदाशिव घटे
बी.कॉम.,एल.एल.बी.,जी.डी.सी. ॲण्ड ए
मो.: ९८३३५२७१२२

अधिकृत प्रतिनिधी

१)श्री. संजय सुरेश खोपे, खोपोली९५६१८१९१९३
२)श्री. अशोक शिवदास साळी,सुरत९९०९६०१९७०
३)श्री. प्रविण जी. ढवण, विंचूर ९८८१५८२७२९
४)श्री. पंडित माधवराव साळी, एरंडोल ९४२३३४३८३०
५)श्री. बाळकृष्ण मारूतीराव डमरे, बडोदा ९४२६०२५११४
६)श्री. विजय गोविंद वैद्य, चिपळूण९०२१५६४०२८
७)श्री. चंद्रकांत आत्माराम हावरे, नाहूर ८७७९१७२९८६

नविन अधिकृत प्रतिनिधींच्या नियुक्ती साठी अर्ज मागविण्यात येत आहे. - १) प्रतिनिधीचे वय २१ ते ७० या दरम्यान असावे. स्थानिक संस्थेचे सभासद असावेत. २) स्वकुळ समाचारसाठी जास्त वेळ देणारे तसेच नविन सभासद, जाहिरात, देणगी, इमारतनिधी आणि आपल्या विभागातील कार्यक्रमाचे वृतांन्त तातकाळ देणारे असावेत. ३) संस्थेबद्दल आस्था असणारे सुशिक्षित व संस्थेसाठी तन,मन,धन अर्पण करणारे असावेत.

जाहिरातीचे दर
रंगीत पूर्ण पान रु. ४५००/- साधे पूर्ण पान रु. १२००/- साधे पावपान रु. ३००/-
रंगीत अर्धेपान रु. २५००/- साधे अर्धेपान रु. ६००/- शुभेच्छा रु. २५१/-
बातमी मधील एक कृष्ण धवल पासपोर्ट साईज फोटो करीता रु. १००/- (फोटोची ईमेज चांगली हवी)

: नम्र निवेदन :

स्वकुळ समाचार हे मासिक ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाजाचा उपक्रम असून ते त्याचे अभिन्न अंग आहे. ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाजाचा तो चेहरा आहे. ती त्याची ओळख आहे. त्याचा प्रसार जवळ जवळ अखिल भारतात झालेला आहे. कदाचित कमीही असेल. परंतु सर्वदूर स्वकुळ समाचार पोहोचविले जाते व वाचलेही जाते. दीपावली विशेषांकांची तर गोष्ट औरच आहे. त्यात येणाऱ्या जाहिराती व सर्व साहित्य लेखनाला योग्य तो न्याय दिलाच जातो. आपला लेख, कविता जे काही असेल ते स्वकुळ समाचारच्या दीपावली विशेषांकात छापून येण्यासाठी देणार्यांचा आग्रह असतो, थोडासा हट्टही असतो तो आम्ही आनंदाने मान्य करतो. कारण आपले लेखन साहित्य छापून येणं ही त्यांच्यासाठी अपूर्वाईची गोष्ट असते. त्यात खूप आनंद असतो, समाधान असते. आणि हीच गोष्ट स्वकुळ समाचारने स्वकुळ वाचकांना आनंदाने पुरविली आहे याचा आम्ही म्हणजे संपादक मंडळांस थोडासा नम्र अभिमान आहे. आजपर्यंत जवळ जवळ ३७ वर्षापेक्षा अधिक कालावधी पर्यंत स्वकुळ समाचारने अगदी कमी वर्गणीत सेवा दिली आहे. आमचे संपादक मंडळ त्यासाठी कुठलाही मोबदला घेत नाही. वेळ, श्रम तर ते देतातच पण वेळेला पैशाचीही मदत करतात. सहकार्य सर्वांचे आहेच. काळ पुढे पुढे जातोच आहे. आजकाल दिवसागणिक प्रत्येक वस्तुचे भाव वाढतच आहेत. आपली सभासद वर्गणी मात्र खूप कमी ठेवली आहे. परंतु आता मात्र ती परवडण्याच्या पलिकडे आहे. त्यात अंक प्रकाशित करणं शक्य होत नाही. लॉकडाऊनच्या काळात माहे एप्रिल २०२० ते जुलै २०२० पर्यंत आपण अंक काढू शकलो नाही. माहे ऑगस्ट २० पासून आतापर्यंत दीपावली विशेषांकासह अंक ठाणे जिल्ह्याच्या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आला आहे. पुढे छापील अंक काढण्याचा कार्यकारिणी विचार करीत आहे. पण मोठ्या निधीची कमतरता आहे. म्हणून जुन्या वर्गणीदारांपैकी रू ५००, रू. ६०० रू १०००/- व रू १५००/- वर्गणीदार असलेल्यांनाच अंक पाठविणे शक्य होईल .जुन्या वर्गणीदारांनी सुधारित वर्गणी भरून सभासद व्हावे अशी कळकळीची नम्र विनंती आहे. रू ५००/- व रू. ६००/- भरलेल्या वर्गणीदारांनीही सुधारित वर्गणीदार व्हावे. बदलत्या काळानुसार वर्गणीत पुन्हा सुधारणा करणे गरजेचे आहे. काळ बदलतो आहे आणि महागाई आपलं विक्राळ रूप अधिक विक्राळ करीत आहे. ती कुणाचाही विचार करीत नाहीये. आम्हीच काय सर्वजण हतबल आहेत. काळानुसार आपणांस बदलावेच लागेल. अन्यथा काळातच विलीन व्हावे लागेल. आतापर्यंत स्वकुळ समाचारने पर्यायाने ठाणे जिल्हा स्वकुळ समाजाने प्रदीर्घ सेवा दिली आहे. म्हणून हे नम्र निवेदन स्वकुळ बांधवांनी विचारात घ्यावे व सहकार्य करावे. ते अस्वीकारार्ह न व्हावे ही अपेक्षा अनाठायी नाही ही आमची धारणा आहे. आपण स्वकुळ वाचक सूज्ञ आहात. चूक भूल झाली असल्यास कृपया क्षमा करावी.

कार्यकारिणी व संपादक मंडळ, ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज.

दि. ३१/०१/२०२१ रोजी झालेल्या उपकरणे वाटप कार्यक्रमाची क्षणचित्रे .

कै. रतिलाल हरी कासटकर व कै. मंजुळाबाई रतिलाल कासटकर (एरंडोल) यांच्या स्मरणार्थ
सौ. शैलजा सोमनाथ कासटकर व श्री. सोमनाथ कासटकर (डोंबिवली) यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

जय जिव्हेश्वर
माता अंकिनी देवी व दशांकिनी देवी की जय

अखिल महाराष्ट्र सकुळ साळी समाज संस्था. महिला मंडळ व युवक मंडळ यांच्यामार्फत दिनांक ३१ जानेवारी २०२१ रोजी महिला सबलीकरण सक्षमीकरण योजनेअंतर्गत आत्मनिर्भर उद्योजकता उपकरणे वाटप समारंभ कालिदास मॅरेज हॉल मुलुंड पश्चिम याठिकाणी संपन्न झाला

श्री. यशवंत जाधवसाहेब अध्यक्ष स्थायी समिती बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या मदतीमुळे ज्येष्ठ समाजसेवक श्री.भरतजी मते व सौ अश्विनी ताई भरत मते यांच्या अथक प्रयत्नातून मुंबई ठाणे रायगड रत्नागिरी जिल्ह्यातील अत्यंत गरजू महिलांना त्यांना त्यांच्या पायावर उभे करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी सात शिलाई मशीने व दोन घरघंटी तसेच एक एम्ब्रोईडरी मशीन (प्रत्येक जिल्ह्यासाठी फिरते)असे एकूण मिळून ३७ साधने मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आली.

श्री यशवंत जाधव अध्यक्ष,स्थायी समिती बृहन्मुंबई महानगरपालिका व सौ. यामिनी जाधव, विधानसभा सदस्य महाराष्ट्र विधानमंडळ यांचे सुपुत्र श्री. निखिल जाधव,सिनेट सदस्य,मुंबई विद्यापीठ यांच्या हस्ते. तसेच ज्येष्ठ समाजसेवक श्री. भरत जी मते, कवी- साहित्यिक श्री. अरुण म्हात्रे, सौ. गीता हरवंदे, श्री. प्रकाश पोळ यांच्या हस्ते व अध्यक्ष अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज संस्था श्री. अशोक दांडेकर, अध्यक्षा, अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज महिला मंडळ सौ. अश्विनीताई मते, युवा अध्यक्ष श्री. विक्रम पाठक, श्री. श्रीकांत बडे, तामिळनाडू राज्य महिला अध्यक्षा श्रीमती- विजया एकबोटे, अ. म. स्व. सा. स. संस्था विभागीय उपाध्यक्षा श्रीमती. कल्पना शिपुरकर अ.म.स्व.सा.स.संस्था उपाध्यक्षा, *सौ. शैलजा कासटकर , व विभागीय उपाध्यक्षा, सौ.किर्ती दळवी तसेच बहुसंख्य समाज बंधू भगिनींच्या साक्षीने साहित्याचे वाटप करण्यात आले. शिलाई मशीन वाटप दरम्यान लाभार्थी महिलांच्या डोळ्यात कृतज्ञतेचे भाव दिसत होते काही भगिनींनी आपले मनोगत व्यक्त करुन श्री व सौ अश्विनी भरत मते कुटुंबीयांचे आभार मानले व आपण-सर्वांसाठी समाज कार्य करण्यासाठी दीर्घायुष्यी होण्यासाठी श्री भगवान जिव्हेश्वर चरणी प्रार्थना केली. सौ.अश्विनीताई भरत मते यांनी आपल्या भाषणाची सुरुवात हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांना स्मरुण केली व आपल्या भाषणामध्ये सदैव आपले पतिराज श्री. भरत मते त्यांचा नेहमी मला पाठिंबा होता आणि या त्यांच्या पाठिंब्यामुळेच मी महिला सक्षमीकरण कार्यक्रमाची ऊर्जा त्यांच्याकडून घेतली आणि हा कार्यक्रम मला यशस्वी या ठिकाणी करता आला असे निक्षुन सांगितले. श्री.यशवंत जाधव साहेबांनी जी मदत देऊ केली त्याबद्दल जाहीर आभार मानले. अखिल महाराष्ट्र सकुळ साळी समाज संस्था,अध्यक्ष श्री अशोकजी दांडेकर यांनी आपल्या भाषणामध्ये सर्वात प्रथम श्री मतेजी साहेबांनी जी महिला सबली करणाची कल्पना मांडली त्या कल्पनेचा विचार करून अखिल महाराष्ट्र साळी समाज संस्थेच्या माध्यमातून सदर कार्यक्रम करण्याचे ठरवण्यात आले .यापूर्वी पश्चिम महाराष्ट्रात अतिवृष्टीने आपल्या समाज बांधवांचे अनुदान नुकसान झाले होते त्यासाठी अखिल महाराष्ट्रातर्फे तीन ते चार लाखाचा निधी हा गोळा करून वाटण्यात आला तसेच कोकणात देखील अनेक घराचे छप्पर उडून गेले त्यांच्यासाठी अखिल महाराष्ट्र साळी समाज संस्थेच्या मदतीने पाच ते सहा लाखांचा निधी हा कोकणामध्ये वाटण्यात आला. त्याचप्रमाणे करोनामुळे अनेकांचे व्यवसाय केलेत अनेक लोक बेरोजगार झाले त्यांना मदत मिळावी म्हणून अत्यंत गरजू महिलांना त्यांना त्यांच्या पायावर उभे करण्यासाठी श्री व सौ मते यांच्या अथक प्रयत्नाने मिळालेल्या मदतीमुळे गरजू महिलांना निश्चितच मदत होईल असे सांगून आपले भाषण संपविले. आजचा कार्यक्रम न भूतो न भविष्यति असा होता .एक नव्हे तब्बल ३७ वस्तूंचे वाटप करण्यात आले व गरिबांचा संसार थाटण्याचा एक प्रयत्न यशस्वी झाला. ज्येष्ठ समाजसेवक श्री.भरतजी मते यांनी आपल्या संभाषणात कार्यक्रमासाठी भविष्यात जर

श्री.जिव्हेश्वर कृपेने आणखी मदत मिळाली तर समस्त अखिल महाराष्ट्रात साधने/शिलाई मशीन गरीब ,गरजू महिलांना देण्याचा प्रयत्न केला जाईल याची ग्वाही दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष रायगड श्री अविनाश साळी व पदाधिकारी,ठाणे जिल्हा अध्यक्ष श्री विनोद सजगुले व पदाधिकारी तसेच स्थानिक अध्यक्ष ,मुंबई विभागीय अध्यक्ष श्री भास्कर चौधरी व पदाधिकारी , रत्नागिरी अध्यक्ष श्री विजय वैद्य व पदाधिकारी रायगड व रत्नागिरी जिल्हा महिला अध्यक्षा, महिला विभागीय उपाध्यक्ष श्रीमती- कल्पना शिपुरकर , यांची मोलाची मदत झाली. तसेच श्री चंद्रकांत हावरे, श्री अजित साळी व श्री उदयकुमार साळी यांची विशेष मोलाची मदत या कार्यक्रमात झाली.

या कार्यक्रमासाठी श्री.गोपाळराव गायकवाड सहचिटणीस,अ.म.स्व.सा.स.संस्था, रायगड महिला अध्यक्षा सौ.श्वेता अंबुर्ले व रत्नागिरी महिला अध्यक्षा सौ.स्नेहलता गोंधळेकर व आजी माजी जिल्हा अध्यक्ष आवर्जुन उपस्थित होते.आलेल्या प्रमुख पाहुण्यांचा फुलगुच्छ,शाल व स्मृती चिन्ह देऊन यथोचित सत्कार अ.म.स्व.सा.स.संस्था व अ.म.स्व.सा.स.महिला मंडळ पदाधिकाऱ्यांन कडून करण्यात आला.

महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज संस्थेचे सरचिटणीस श्रीयुत भालचंद्र साळी यांनी सरतेशेवटी उपस्थितांचे व देणगीदारांचे आभार मानले. तर कार्यक्रमाचा चोख हिशोब कोषाध्यक्ष श्री. संतोष अंबुर्ले यांनी ठेवला. कार्यक्रमाची सुरुवात उल्हासनगरच्या भगिनी कुमारी श्रृती मोहन केंदुळे यांच्या स्वागत गीताने व कार्यक्रमाची प्रस्तावना सौ.कल्पना शिपुरकर यांनी केली तर कार्यक्रमाची सांगता सौ संगीताताई अविनाश साळी यांच्या पसायदानाने झाली .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अगदी खुमासदार शैलीत व शिस्तबद्ध पध्दतीने डॉ. प्रतिक्षा बोर्डे व सौ.मेघना कांबळी यांनी केले.

धन्यवाद || जय जिव्हेश्वर||

बलसागर साळी होवो, विश्वात शोभुनी राहो

वृत्तांत : स्वकुळ समाचार

रायगड जिल्ह्यातील खालील प्रमाणे २ महिलांना घरघंटी व ७ महिलांना शिलाई मशीन प्रदान करण्यात आल्या आहेत.

घरघंटी -

१) सौ. नेहा नित्यानंद वाऊळ- कल्याण २) श्रीमती सुषमा सुभाष कोळेकर- बदलापूर

शिलाई मशीन

१) श्रीमती शितल अनंता दुर्गुळे- महाड २)सौ संतोषी सचिन दांडेकर- भांडूप ३) सौ शितल शरद हरवंदे- अंबरनाथ* ४)सौ स्मिता सतिष दांडेकर - ठाणे* ५) *श्रीमती. अंजना अशोक साळी- शिवडी* ६)सौ मनिषा मनोहर दांडेकर- डोंबिवली* ७) सौ.नम्रता राजेंद्र डोईफोडे- मालाड

दानयज्ञ - ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज

जेष्ठ समाजसेवक श्री भरत श्रीधर मते व ईशान्य मुंबईच्या माजी नगरसेविका (शिवसेना)सौ.अश्विनी ताई भरत मते यांच्या अथक प्रयत्नाने श्री यशवंत जाधव, स्थायी समिती अध्यक्ष, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी मोठी मदत उपलब्ध करून दिली. समाजातील गरजू, निराधार महिलांनी आत्मनिर्भर व्हावे यासाठी ३० शिलाई यंत्रे, ९ घरघंटी व १ एम्ब्रायडरी मशीन प्राप्त करून दिलीत. श्री व सौ अश्विनीताई भरत मते यांनी ती साळी समाजातील मुंबई विभाग, ठाणे, रायगड व रत्नागिरी मधील गरजू, निराधार महिलांना अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज संस्था, महिला मंडळ व युवा मंडळाच्या सहकार्याने वाटप करण्याचे निश्चित केले. त्यानुसार दि. ३१.१.२०२१ रोजी कालिदास सभागृह, मुलुंड येथे झालेल्या कार्यक्रमात उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते सर्व गरजू, निराधार महिलांना त्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे योग्य ते नियोजन व्हावे म्हणून अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक दांडेकर यांनी व महिला मंडळ अध्यक्षा सौ.अश्विनीताई भरत मते व पदाधिकारी यांनी सभा घेऊन सुनियोजित नियोजन करून सर्व संबंधितांना योग्य त्या सूचना दिल्या. त्यानुसार ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाजाने श्री विनोद सजगुले यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक संस्थेच्या अध्यक्षांकडून आपापल्या भागातील गरजू, निराधार महिलांना शिलाई मशीन ,घरघंटी वाटपासाठी अर्ज मागविण्यात आले. सर्वच अर्जांची छाननी करण्यात येऊन आत्यंतिक गरजूंचीच यादी करण्यात येऊन ती अखिल महाराष्ट्र कार्यकारिणीस सुपूर्द करण्यात आली. याकामी सर्वश्री विनोद सजगुले, राजेश साळी, ईश्वर फंड, भालचंद्र साळी, गोपाळ थोरात, कृष्णा वाझट व डॉ.किसनराव जेधे यांनी सहकार्य केले. डॉ.किसनराव जेधेंनी उल्हासनगर, म्हारळगांव येथे व्यक्तिशः भेट देऊन गरजूंचे अर्ज प्राप्त करून घेतले. श्री कृष्णा वाजट व विकास वखारेंनीही आपापल्या भागातील अर्ज मिळविले. आज या सर्वांना वरील उपकरणे वाटप या कार्यक्रमात झाले आहे. लाभार्थींची यादी स्वतंत्रपणे छापली आहे. लाभार्थी प्रमाणेच इतर समाज बांधवांनींही कार्यक्रमास उपस्थित राहून सोहळ्याचा सुखद अनुभव घ्यावा म्हणून आवाहन करण्यात आले होते. त्याप्रमाणे ज्यांचा कार्यक्रमांत मोठा सहभाग होता ते आमचे माजी अध्यक्ष श्री उदयकुमार साळी, माजी अध्यक्ष, सेक्रेटरी, संपादक डॉ.किसनराव जेधे व त्यांच्या सौ. संगिता जेधे,

अध्यक्ष श्री. विनोद सजगुले, श्री राजेश साळी, ईश्वरलाल फंड, संपादक श्री गोपाळ थोरात व सौ.पुष्पलता थोरात, सौ.प्रियांका चिल्लाळ, सहसंपादक श्री अविनाश धोत्रे, व सौ.अनघा धोत्रे, श्री व सौ. संगिता पुरूषोत्तम साळी, श्री व सौ मंगेश कनोजे, सौ.अनिता सतिश क्षिरसागर, श्री व सौ. चित्रा यशवंत भंदिर्गे, सौ.लक्ष्मी केंदुळे, ॲड. कु.सोनल व ॲड. प्रीती दाहोत्रे, श्री विकास वखारे, श्री. कृष्णा वाजट, प्रदिप साळी, श्री आनंद पावले. शिवाय लाभार्थी त्यांच्या कुटुंबासह उपस्थित होते. सत्कार समारंभाची व उपकरणे वाटपाचीही जबाबदारी असल्याने डॉ.किसनराव जेधेंनी जातीने लक्ष घालून ती पार पाडली. कु. श्रृती केंदुळे, हिने स्वागत गीत गाईले. या सुखद सोहळ्याचे प्रमुख पाहुणे श्री यशवंत जाधव, स्थायी समिती अध्यक्ष, बृहन्मुंबई महानगरपालिका व सौ. यामिनीताई जाधव, विधानमंडळ सदस्या यांचे सुपुत्र श्री.निखिल जाधव ,मुंबई विद्यापीठ सिनेट सदस्य, साहित्यिक क्षेत्रातील कवी श्री अरूण म्हात्रे, प्रकाश पोळ, साहित्यिका सौ.गीता हरवंदे, अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोकजी दांडेकर, सचिव श्री. भालचंद्र , साळी, उपाध्यक्षा सौ. शैलजा कासटकर, सौ. किर्ती दळवी, युवा अध्यक्ष श्री विक्रम पाठक आणि हा दानयज्ञ ज्यांच्यामुळे संपन्न झाला ते उभयता श्री व सौ. अश्विनीताई भरत मते व महाराष्ट्राची संपूर्ण कार्यकारिणी ,मुंबई, रायगड, रत्नागिरी मधील सर्व लाभार्थी व समाजबांधव या सुखद सोहळ्याचे साक्षीदार होते. मूळातच कोरोना

संकटामुळे व उपस्थिती वरील बंधनांमुळे किती समाजबांधव उपस्थित राहतील अशी शंका होती पण सभागृह गच्च भरले व काही प्रेक्षक बाजूला व बाहेर उभे असल्याचे पाहता शंकेला वाव राहिला नाही. उपस्थित साहित्यिक, कवी व पाहुण्यांनी प्रसंगानुरूप आपले बुध्दीवैभव प्रकट केले .महिलांचे सबलीकरण काय अन् सक्षमीकरण काय यावर यथोचित भाष्य केले आणि या दानयज्ञाचे अध्वर्यू श्री व सौ. अश्विनी ताई भरत मते यांच्यावर आभाळातून पुष्पवृष्टी व्हावी तद्वत कौतुकाचा वर्षाव केला. जवळजवळ सर्वांनीच त्यांचा सत्कार केला व आठवण म्हणून त्यांच्याबरोबर आपापले छायाचित्र काढून घेतले. ती एक सुखद पण यथोचित चढाओढ होती. श्री व सौ मते दाम्पत्यानेही निस्पृहपणे, निगर्वीपणाने, निरभिमानाने, स्थितप्रज्ञाने त्याचा हसतमुख स्वीकार केला.जेष्ठांनी त्यांना आशिर्वाद दिले, समवयस्कांनी शुभ चिंतिले, लाभार्थी तर काय देऊ अन् काय नाही म्हणून संकोचले. बाकीच्यांनी मूकपणानेच मनोमन सर्वकाही देऊ केले. यामुळे त्यांच्या चेहेर्यावर कृतार्थतेची भावना मात्र होती. कार्यक्रमाच्या निवेदिका सौ.मेघना कांबळी व सौ.प्रतिक्षा बोर्डे यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन करतांना आपल्या जवळील सर्व शब्दभांडार खुले केले व शब्दसुमने उधळून फटाक्याशिवाय दिवाळीच साजरी केली. कुठेही कंजूसपणा केला नाही. कार्यक्रमाची रंगत त्यामुळेच उत्तरोत्तर वाढत गेली. कार्यक्रमाच्या यश्स्वीतेमधील त्यांचा सहभाग लक्षणीय होता. त्यांचं तर कौतुक स्वतंत्रपणेच करायला हवं म्हणून त्यांना मन:पूर्वक धन्यवाद देतांना आम्हीही कंजूषपणा करणार नाही. शेवटी श्री भालचंद्र साळी यांनी सर्वांचे आभार मानले, सर्वांनी अल्पोपहार घेतला. अशा या पुण्यप्रद गाथेचं कवित्व कित्येक दिवस चालेल पण कायम आठवणीत राहील. अशा या दानयज्ञाची हृष्य स्वरूपातील मनोवेधक गाथा महिनाअखेरच्या दिवसाच्या उत्तर संध्येनंतर रात्रौ ८.०० वाजता सफळ संपूर्ण झाली.

गोपाळ थोरात, संपादक व संपादक मंडळ,
ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज कार्यकारिणी , तांत्रिक अध्यक्ष व समिती.

अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज संस्था, अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज संस्था

जय जिव्हेश्वर..

जय माता अंकिनी..जय माता दशांकिन

अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज संस्था, अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा....एक हात मदतीचा....महिला सक्षमी - सबलीकरण....आत्मनिर्भरतेचा...याचि साठी केला होता अट्टाहास.....सकल साळी समाज आत्मनिर्भर व्हावा अखिल महाराष्ट्र सकुळ साळी समाज संस्था. महिला मंडळ व युवक मंडळ यांच्यातर्फे दिनांक ३१ जाने. २०२१ रोजी महिला सबलीकरण, सक्षमीकरण व आत्मनिर्भर उपक्रमांतर्गत शिवण यंत्र व घरघंटी वाटप समारंभ कालिदास मॅरेज हॉल, मुलुंड पश्चिम, मुंबई - ८०. याठिकाणी दुपारी ४.०० ते ८.०० वा.उत्साहात व दिमाखात संपन्न झाला. सभास्थानी आलेल्या प्रमुख मान्यवर पाहुण्यांचे समाज सुवासिनींच्या हस्ते औक्षण करण्यात आले.सभेच्या सुरूवातीला मान्यवरांच्या हस्ते भगवान श्रीजिव्हेश्वर प्रतिमा पुजन व आरती करण्यात

आली. कोरोना १९ या आकस्मिक जागतिक महामारीने दिवगंत झालल्या समाजातील ज्ञात - अज्ञात बंधु - भगिनिंना श्रध्दांजली वाहण्यात आली, तद् नंतर मान्यवर मा.श्री. यशवंत जाधव, अध्यक्ष,स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका व मा. सौ.यामिनी यशवंत जाधव, विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ यांचे सुपुत्र श्री.निखिल जाधव ,सिनेट सदस्य,मुंबई विद्यापीठ, ज्येष्ठ समाजसेवक श्री भरत मते, प्रख्यात नामवंत कवी, श्री. अरुण म्हात्रे, कवी श्री.प्रकाश पोळ,सौ..गीता हरवंदे,श्री.अशोक दांडेकर,अध्यक्ष अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज संस्था, सौ.अश्विनी भरत मते,अध्यक्षा,अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज महिला मंडळ, डॉ. किरण दोशी,डॉ. हरेन शहा, सौ.शैलजा कासटकर, उपाध्यक्षा, अ.म.स्व.सा.स.संस्था, श्री.श्रीकांत बडे, उपाध्यक्ष, अमस्वसाससंस्था,श्री. भालचंद्र साळी, सरचिटणीस, अमस्वसाससंस्था , श्री. संतोष अंबुर्ले, कोषाध्यक्ष , श्री. गोपाळ गायकवाड, सहासचिव, अमस्वसाससंस्था, श्री. भास्कर चौधरी, विभागिय अध्यक्ष. अमस्वसाससंस्था, विक्रम पाठक, युवा अध्यक्ष,अमस्वसाससंस्था, तेलंगणा राज्य महिला अध्यक्षा,श्रीमती. विजया एकबोटे, श्रीमती.कल्पना शिपुरकर व सौ.किर्ती दळवी, उपाध्यक्षा, अ.म.स्व.सा.स.संस्था महिला मंडळ,श्री. चंद्रकांत हावरे, अध्यक्ष , स्वकुळ साळी ज्ञातिगृह, आळंदी, श्री.अजित साळी, श्री. राजेंद्र शेंद्रे,व सतिष डोईफोडे, सदस्य , अमस्वसाससंस्था.यांना व्यासपीठावर पाचारण करण्यात आले. मान्यवर स्थानापन्न झाल्यावर कार्यक्रमाची सुरुवात कु. श्रृती मोहन केंदुळे यांच्या स्वागत गीताने झाली. प्रमुख पाहुण्यांचा फुलगुच्छ, शाल व सन्मान चिन्ह देऊन यथोचित सत्कार अ.म.स्व.सा.स.संस्था व अ.म.स्व.सा.स.महिला मंडळ पदाधिकाऱ्यां कडून करण्यात आला.सौ. कल्पना शिपुरकर यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली.प्रख्यात कवी अरूण म्हात्रे यांनी आपल्या खुमासदार शैलीत सभागृहातील श्रोत्यांना उंच माझा झोका शिर्षक गीत व आईची महती विषद करणा-या जना-मनातील कवितांनी मंत्रमुग्ध केले. कवीवर्य प्रकाश पोळ यांनीही आपल्या खास शैलीत श्रोत्यांची मने जिंकली.या लॉक डॉऊन नंतरच्या पहिल्याच कार्यक्रमात आपल्या समाज बंधु-भगिनिंची मनं काव्यात्मक आस्वादाने प्रफुल्लित झाली.सौ.गीता हरवंदे यांनी महिला महती ,चूल मुल सांभाळणारी स्त्री कशी सोशिक , कुटुंबासाठी धडपडणारी ,आलेल्या प्रसंगाला धीरोदात्त पणे सामोरे जाणारी ,पण आर्थिक अडचणीत कधी आत्महत्या केल्याचे ऐकिवात नाही असे महिलांसाठी गौरोवोद्गार काढले सौ.अश्विनी भरत मते यांनी आपल्या भषणाची सुरुवात हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांना स्मरुन केली व आपल्या भाषणामध्ये सदैव आपले पति श्री.भरत मते साहेबांचा नेहमी मला पाठिंबा होता आणि या त्यांच्या पाठिंब्यामुळेच मी महिला सक्षमीकरण कार्यक्रमाची ऊर्जा त्यांच्याकडून घेतली आणि हा कार्यक्रम मला यशस्वी करता आला असे आवर्जून सांगितले. श्री.यशवंत जाधव साहेबांनी जी मदत देऊ केली त्याबद्दल त्यांनी जाहीर आभार मानले.अखिल महाराष्ट्र सकुळ साळी समाज संस्था,अध्यक्ष श्री. डॉ अशोक वि. दांडेकर यांनी आपल्या भाषणामध्ये

सर्वात प्रथम श्री. भरत मते साहेबांनी जी महिला सबली करणाची कल्पना मांडली त्या कल्पनेचा विचार करून अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज संस्थेच्या माध्यमातून सदर कार्यक्रम करण्याचे ठरवण्यात आले. यापूर्वी ऑगस्ट २०१९ मध्ये पश्चिम महाराष्ट्रात अतिवृष्टीने झालेल्या महापुराने समाज बांधवांचे संसार वाहून गेले त्यासाठी अखिल महाराष्ट्रा तर्फे तीन ते चार लाखाचा निधी हा गोळा करून किचन किट संस्थेतर्फे बाधित कुटुंबास वाटण्यात आला . तसेच कोविड प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन जाहीर झाल्याने रोजगार अस्त पावला अशा बाधित कुटुंबीयांस ४ लाखापर्यंत जेवणासाठी लागणारे जिन्नस व कांहीं रोख रक्कम संस्थे तर्फे बीड,मराठवाडा, धुळे, नाशिक, अहमदनगर , इचलकरंजी, पुणे,तसेच उल्हासनगर, अंबरनाथ या उपनगरामध्ये पाठविण्यात आले . निसर्ग चक्रीवादळाने रायगड ,रत्नागिरी या कोकणातील अनेक घरांची छप्परे उडून गेली त्यांच्यासाठी अखिल महाराष्ट्र स्वकुळसाळी समाज संस्थेच्या मदतीने पाच ते सहा लाखांचा निधी प्रत्येकाच्या खात्यावर वाटण्यात आला. त्याचप्रमाणे कोविड १९' प्रादुर्भाव बळावल्याने लॉकडाऊनमुळे अनेकांचे व्यवसाय बंद झाले ,अनेक लोक बेरोजगार झाले त्यांना मदत मिळावी म्हणून गरजू महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी अ. म.स्व. सा. स. महिला मंडळ यांच्या सहकार्याने मिळालेल्या मदतीने गरजू महिलांना निश्चितच मदत होईल असे प्रतिपादन अध्यक्षांनी केले. ज्येष्ठ समाजसेवक श्री.भरत मते यांनी आपल्या भाषणात कार्यक्रमासाठी भविष्यात जर श्री.जिव्हेश्वर कृपेने आणखी मदत मिळाली तर समस्त अखिल महाराष्ट्रात शिवण यंत्र व घरघंटी गरीब,गरजू महिलांना देण्याचा प्रयत्न केला जाईल याची ग्वाही दिली.श्री. यशवंत जाधवसाहेब,अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या मदतीने ज्येष्ठ समाजसेवक श्री.भरत श्रीधर मते व सौ.अश्विनी भरत मते यांच्या अथक प्रयत्नातून मुंबई ,ठाणे, रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील गरजू महिलांना आर्थिक स्थिरता लाभावी, आत्मनिर्भर होऊन स्वबळावर उभे राहता यावे त्यासाठी उपरनिर्दिष्ट जिल्ह्यास प्रत्येकी ७ शिवण यंत्र व दोन घरघंटी तसेच एक एम्ब्रायडरी मशीन (प्रत्येक जिल्ह्यासाठी फिरते) अशी एकूण ३७ संसाधने मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले.शिवण यंत्र व घरघंटी मदत स्विकारणा-या लाभार्थी महिलांच्या डोळ्यात कृतज्ञतेचे भाव दिसत होते.काही भगिनींनी आपले मनोगत व्यक्त करुन श्री व सौ अश्विनी भरत मते कुटुंबीयांचे आभार मानले व आपण-सर्वांसाठी समाज कार्य करण्यासाठी दीर्घायुषी होण्यासाठी श्री भगवान जिव्हेश्वर चरणी प्रार्थना केली. २८ शिवणयंत्रे ८ घरघंटी व १ एम्ब्रायडरी मशिन विशेष प्रयत्नाने उपलब्ध करून देणाऱ्या श्री.भरत मते व सौ. अश्विनी मते तसेच सदर कार्यक्रम तन मन धन अर्पून यशस्वी करणासाठी अविश्रांत मेहनत घेणाऱ्या व संबधित कार्यकर्त्यांना सतत प्रोत्साहीत करणाऱ्या डॉ. अशोक दांडेकर यांचा सत्कार मुंबई विभाग, ठाणे जिल्हा ,रायगड जिल्हा व रत्नागिरी जिल्हाध्यक्ष, कार्यकारिणी सदस्य कार्यकर्ते यांनी उत्स्फुर्तपणे सत्कार केला कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुंबई विभागीय अध्यक्ष, श्री.भास्कर चौधरी, ठाणे जिल्हाध्यक्ष श्री विनोद सजगुले व

पदाधिकारी तसेच स्थानिक अध्यक्ष, जिल्हाध्यक्ष, रायगड श्री.अविनाश साळी,महिला मंडळ अध्यक्षा, सौ.श्वेता अंबुर्ले व पदाधिकारी, व रत्नागिरी जिल्हाध्यक्ष श्री विजय वैद्य, महिला मंडळ अध्यक्षा, सौ.स्नेहलता गोंधळेकर व पदाधिकारी तसेच आजी माजी जिल्हाध्यक्ष यांनी आपल्याला सोपविण्यात आलेली जबाबदारी यशस्वी पणे निभावून मोलाची मदत केली. श्री. चंद्रकांत हावरे,श्री.अजित साळी व श्री. उदयकुमार साळी व डॉ. किसन जेधे यांची विशेष मोलाची मदत झाली.कोविड १९ च्या सर्वांना आठवणीही नकोशा वाटणाऱ्या या शेवटच्या पर्वातही स्वसुरक्षेसाठी स्वतःचा मास्क व उपबध्द करून दिलेल्या सनिटॉयजर स्प्रेचा वापर करून बहुसंख्येने समाज बंधु-भगिनी कुटुंबियांसह उपस्थित होते. अहमदनगरहून श्री.सागावकर, श्री. लांडगे, पुणे स्वकुळ साळी समाज संस्थेचे सदस्य, श्री.बजरंग आकडे,श्री.पंडितराव मर्ढेकर,श्री.सुधाकर जाळीद्रे ,श्री. राजूशेठ टपले, सोलापूरहुन श्री.ज्ञानेश्वर सपकाळ,अध्यक्ष,श्री. जिव्हेश्वर विद्यार्थी विकास मंडळ सोलापूर यांची विशेष उपस्थिती होती. महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज संस्थेचे सरचिटणीस श्री.भालचंद्र साळी यांनी सरतेशेवटी उपस्थितांचे, देणगीदारांचे व कार्यक्रम यशस्वी करणाऱ्या मदतनीसांचे आभार मानले.त्याबरोबरच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिस्तबद्ध व खुमासदार शैलीत करणाऱ्या डॉ.प्रतिक्षा बोर्डे व सौ.मेघना कांबळी तसेच सभागृह समोर संस्कार भारती रांगोळी रेखाटणा-या, स्वागत गीत व पसायदान सादर करणाऱ्या अनुक्रमे सौ.शुभांगी पावले-जोशी, कु.श्रृती मोहन केंदुळे व सौ. संगीता अविनाश साळी यांचा प्रमुख पाहुणे कवी श्री.अरूण म्हात्रे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता सौ संगीता अविनाश साळी यांच्या सुमधुर स्वरातील पसायदानाने झाली.उपस्थित समाज बंधु-भगिनी कुटुंबियांना अल्पोपहार खाद्य पदार्थाचे बॉक्स वाटप करून अविस्मरणिय कार्यक्रमाचा सांगता समारोप करण्यात आला.

धन्यवाद....जय जिव्हेश्वर. **~ श्री. भालचंद्र साळी,सरचिटणीस,अमस्वससंस्था**

महिलांनी आत्मनिर्भर व्हावे -

अश्विनीताई मते अ.म.स्वकुळ साळी समाज संस्था व महिला मंडळाच्या संयुक्त विद्यमानेमहिलांना घरघंटी व शिलाई मशीन वाटप सोहळा उत्साहात संपन्नअखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज संस्था व महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महिला सबलीकरण उपकरणे वाटप कार्यक्रम रविवार दिनांक ३१ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात कालिदास नाट्यगृह मुलुंड येथे संपन्न झाला, प्रथम सर्व मान्यवरांचे रायगड जिल्हा महिला मंडळाने औक्षण करून स्वागत केले. कार्यक्रमाची सुरुवात भगवान जिव्हेश्वर व माता अंकिनी- दशांकिनी प्रतिमेचे पूजन, दिप प्रज्वलन व आरती करुन करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांना व्यासपीठावर आमंत्रित करण्यात आले मान्यवरांमध्ये मुंबई विद्यापीठ सिनेट सदस्य युवा नेते निखिल जाधव, प्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे, प्रकाश पोळ, युवानेते विक्रम पाठक, इचलकरंजी शिखर संस्थेचे उपाध्यक्ष बडे, प्रख्यात हृदयरोग तज्ञ डॉ. दोशी,डॉ. शहा, समाज लेखिका गीता हरवंदे, शिखर संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर अशोक दांडेकर, ज्येष्ठ समाजसेवक भरत मते, विभागीय अध्यक्ष भास्कर चौधरी, पंढरपूर मठाचे सचिव राजेंद्र शेंद्रे, महाराष्ट्र शिखर संस्थेचे सदस्य पदाधिकारी, पुणे साळी समाज संस्थेचे पदाधिकारी

श्री. मर्ढेकर व इत्यादी मान्यवर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिखर संस्था महिला मंडळाच्या उपाध्यक्षा सौ.कल्पना शिपूरकर यांनी अत्यंत सुंदर सादर केलेउपस्थित मान्यवरांनी आयोजित केलेल्या अभिनव कार्याबद्दल समाधान व्यक्त करून महिलांना आत्मनिर्भर करण्याच्या संकल्पनेबद्दल संस्थेची स्तुती करून आणखी काही मदत लागल्यास ती दिली जाईल असे आश्वासन देखील यावेळी दिले. स्त्री ही सर्व शोधाची जननी आहे. त्यामुळे स्त्रियांनी स्वतःला कमजोर समजू नये. महिला ह्या अबला आहेत हा कलंक पुसून आम्ही सबला आहोत ही ताकद निर्माण करण्याची वेळ आली आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी आम्हाला शिक्षणाचे बाळकडू पाजले आहे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना संविधानाच्या माध्यमातून सर्व अधिकार प्राप्त करून दिले आहे. देशात मोठ्या प्रमाणात महिलांनी विविध क्षेत्रात प्रगती केली आहे. स्त्रिया मोठे पद भूषवित आहेत, तर उद्योगाच्या बाबतीत ही महिलांनी प्रगतीचे पाऊल उचलले आहे. स्त्रियांनी कुठलाही अन्याय सहन न करता तेवढ्याच ताकतीने अन्यायाचा प्रतिकार करावा व आत्मनिर्भर व्हावे असे आवाहन महिला मंडळाच्या अध्यक्षा अश्विनी मते यांनी केले. त्याच प्रमाणे या कार्यक्रमाला लागणारी उपकरणे उपलब्ध करून दिल्याबद्दल शिवसेना उपनेते श्री यशवंत जाधव व सौ यामिनी जाधव या उभयतांना धन्यवाद दिले त्यांच्यामुळेच हा कार्यक्रम आयोजित करुन शकलो याचा उल्लेख करुन ३७ महिलांना आत्मनिर्भर होत आहेत याचा उल्लेख करून धन्यवाद दिले. श्री भरत मते यांनी याच प्रमाणे शक्य झाल्यास महाराष्ट्रातील इतर महिलांना सुद्धा उपकरणे वाटप करण्याचा प्रयत्न केला जाईल.शिखर संस्थेचे अध्यक्ष डॉ दांडेकर यांनी संस्थेने आजपर्यंत समाज बांधवांसाठी केलेल्या उपयुक्त कामाचा उहापोह करुन समाजबांधवांना आत्मनिर्भर करण्यासाठी शिखर संस्थाकडून विशेष मेहनत घेतली जाईल असे आश्वासन दिले. डॉ अशोक दांडेकर यांनी या कार्यक्रमास अत्यंत मेहनत घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रायगडवासीय ९ महिलांना साहित्य वाटप करण्यात आले . त्यामध्ये महाड येथील श्रीमती शीतल दुर्गुले, भांडुप येथील सौ.संतोषी दांडेकर, अंबरनाथ येथील सौ. शितल हरवंदे, ठाणे येथील सौ. स्मिता दांडेकर, मुंबई शिवडी येथील श्रीमती अंजना साळी, डोंबिवली येथील मनिषा दांडेकर, मालाड येथील सौ.नम्रता डोईफोडे या महिलांना शिलाई मशीन तर कल्याण येथील सौ.नेहा वाऊळ आणि बदलापूर येथील श्रीमती सुषमा कोळेकर यांना घरघंटीचे वाटप करण्यात आले. दिप प्रज्वलन गीत व पसायदान सादर करणा-या समाज भगिनी सौ संगीता साळी यांचा सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे यांच्या हस्ते सत्कार देखील यावेळी करण्यात आला.या कार्यक्रमाला धरून हळदी कुंकूचा ही कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, हळदी - कुंकू कार्यक्रमाची संपुर्ण जबाबदारी रायगड जिल्हा महिला मंडळाच्या महिलांनी अत्यंत जोख सांभाळली. कार्यक्रमास महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रतिक्षा बोर्डे व मेघना कांबळी यांनी अत्यंत सुंदर प्रकारे केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज अध्यक्ष डॉ. अशोक दांडेकर, अश्विनी मते, भरत मते, ज्येष्ठ समाजबांधव चंद्रकांत हावरे, अजित साळी, रायगड जिल्हा स्वकुळ साळी समाज अध्यक्ष अविनाश साळी, संतोष आंबुर्ले, विजय वैद्य, भालचंद्र साळी, सौ. कल्पना शिपूरकर सौ. श्वेता अंबुर्ले यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमास उपस्थित समाजबंधू भगिनींना अल्पोपहार देण्याचे काम रायगड जिल्हा मंडळाच्या सदस्यांनी हाताळले. संस्थेचे सचिव भालचंद्र साळी यांनी आभार प्रदर्शन केले, तर कार्यक्रमाची समाप्ती पसायदानाने करण्यात आली. गेली दहा महिन्यात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर एकही कार्यक्रम पार न पडल्यामुळे या कार्यक्रमाला उपस्थितांमध्ये मोठा उत्साह पहायला मिळाला.

- श्री. अविनाश साळी

"पिंपरी-चिंचवड स्वकुळ साळी समाज (विणकर) संस्थेतर्फे नामसूचीचे प्रकाशन व कार्यकर्त्यांचा सत्कार"

नामसूची प्रकाशन :--निगडी प्राधिकरण पिं- चिं., देहूरोड व तळेगाव स्वकुळ साळी समाज (विणकर) अधिकृत सभासद नामसूचीचे प्रकाशन करताना डावीकडून श्री. शिवानंद धोत्रे, श्री. मुकुंद साळी, श्री. नाथा मानकर सर, श्री. वसंत नगरकर, श्री. कृष्णा कांबळे,श्री. अजित महादार, व श्री. महेश जयदेवकर.

वाढदिवस करताना :--श्री. वसंत रंगनाथ नगरकर यांचा ८३ वा वाढदिवस साजरा करताना. अध्यक्ष श्री. मानकर सर माजी प्राचार्य, व श्री जिव्हेश्वर सांस्कृतिक सेवा मंडळाचे उपाध्यक्ष श्री. अजित शंकरराव महादार साहेब.

निगडी प्राधिकरण येथील स्वकुळ साळी समाज (विणकर) पिंपरी-चिंचवड, देहूरोड व तळेगाव संस्थेतर्फे २६ जानेवारी २०२१ रोजी ७२व्या प्रजासत्ताक दिनी अधिकृत सभासद नामसूचीचे प्रकाशन, कार्यकर्त्यांचे वाढदिवस व कार्यकर्त्यांचा सत्कार समारंभ संस्थेच्या श्री जिव्हेश्वर सांस्कृतिक भवन येथे संपन्न झाला.

सभेच्या सुरुवातीला भगवान श्री जिव्हेश्वरांच्या मूर्तीला अध्यक्ष श्री.नाथा मानकर सर, माजी प्राचार्य व सल्लागार स्वकुळ गौरव श्री.वसंत रंगनाथ नगरकर यांच्या शुभहस्ते पुष्पहार घालून करण्यात आली. सहसचिव श्री.महेश मधुकर जयदेवकर यांनी समाजाच्या दिवंगतांना श्रध्दांजली वाहिली. सभेस उपस्थित असलेल्या कार्यकारिणी सदस्यांचे स्वागत व प्रास्ताविक अध्यक्ष श्री.मानकर सर यांनी केले. लॉकडाऊनमध्ये समाजाच्या कार्यकारिणीच्या ९ मिटींग गुगल मिटवरच घेण्यात आल्या व १०वी मिटींग ही श्री जिव्हेश्वर सांस्कृतिक भवन येथे घेण्यात आली. लॉकडाऊन मध्ये ऑनलाईन पैसे जमा करणाऱ्या समाज बांधवांचे आभार मानले व ३१ मार्च २०२१ पर्यंत राहिलेल्या सभासदांना ऑनलाईन किंवा विभागवार प्रतिनिधींच्याकडे जमा करण्याचे आवाहन केले. विषय पत्रिकेवरील विषय संपल्यानंतर समाजाच्या अधिकृत सभासद नामसूचीचे प्रकाशन सल्लागार श्री.वसंत रंगनाथ नगरकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी मंचावर अध्यक्ष श्री.मानकर सर, उपाध्यक्ष श्री.मुकुंद साळी, सचिव श्री.कृष्णा कांबळे, सहसचिव श्री.महेश जयदेवकर, खजिनदार श्री.दिलीप बिडकर, हिशेब तपासनीस श्री.शिवानंद धोत्रे व श्री जिव्हेश्वर सांस्कृतिक सेवा मंडळाचे उपाध्यक्ष श्री.अजित महादार साहेब यांच्या उपस्थित पार पडले.

नामसूचीच्या प्रकाशनानंतर सल्लागार श्री.वसंत रंगनाथ नगरकर यांनी आपल्या मनोगतात स्वकुळ साळी समाज (विणकर) ही मुख्य संस्था असून श्री जिव्हेश्वर सांस्कृतिक सेवा मंडळ, श्री जिव्हेश्वर महिला मंडळ, श्री जिव्हेश्वर नागरी सहकारी पतसंस्था व श्री जिव्हेश्वर सहकारी गृहरचना या मुख्य संस्थेच्या सहाय्यक संस्था आहेत या सहाय्यक संस्थांनी मुख्य संस्थेशी संघर्ष न करता नेहमीच सहकार्याने काम करावे, कारण सहाय्यक संस्थेचे सर्व कार्यक्रम मुख्य संस्थेचे कार्यकारिणी सदस्यच राबवत असतात अशी अपेक्षा व्यक्त केली. या नंतर श्री जिव्हेश्वर सांस्कृतिक सेवा मंडळाचे उपाध्यक्ष श्री.अजित शंकरराव महादार यांनी आपल्या मनोगतात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी समाज संस्थेला रु.१५०००/- ची देणगी दिली.

कै. श्री. तुकाराम रामचंद्र वखारे (वडील), कै. श्रीमती सुलोचनाबाई तुकाराम वखारे (आई) व
कै. श्री. सुभाष तुकाराम वखारे (भाऊ) यांच्य स्मरणार्थ श्री. सुरेश तुकाराम वखारे (अहमदनगर) यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

जानेवरी २०२१ पासून स्वत:साठी समाज (विणकर) कार्यकारिणी सदस्यांचेच वाढदिवस त्याच महिन्यात साजरे करण्याचा नविन उपक्रम सुरु करण्यात आला. जेष्ठ सल्लागार श्री.वसंत रंगनाथ नगरकर यांना ८३ वर्षे, श्री.रमेश गोपाळ शिंगारे यांना ६६ वर्षे व श्री.सुधाकर शंकरराव वाळके यांना ६२ वर्षे पुर्ण झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच कोरोनाच्या काळात बँकेतील ऑनलाईन पैसे जमा करण्याचे अवघड काम सातत्याने ८ महिने केल्याबद्दल खजिनदार श्री.दिलीप माधव बिडकर यांना शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन व श्री.अजित शंकरराव महादार साहेब यांना नामसूची देऊन सत्कार करण्यात आला. जेष्ठ सल्लागार श्री.वसंत नगरकर यांनी उपस्थित कार्यकारिणी सदस्यांना तिळगुळ वाटप व अध्यक्ष श्री.मानकर सर यांच्या हस्ते नामसूचीचे वाटप करण्यात आले. लॉकडाऊनमध्ये ----- वार्षिक वर्गणी व आपत्कालीन निधी जमा करणाऱ्या सर्व समाज बांधव सभासदांना पावत्यांचे वाटप विभाग प्रतिनिधींकडे खजिनदार श्री.दिलीप बिडकर व किशोर मानकर यांच्या हस्ते करण्यात आले.

पिंपरी-चिंचवड स्वकुळ साळी समाज (विणकर) समाज संस्थेचे एकुण ३३ विभागाचे अध्यक्षांसह ३३ कार्यकारिणी सदस्य, प्रसहाय्यक कार्यकारिणी सदस्य व एक सल्लागार असून त्या महिन्यातील कार्यकारिणी सदस्यांचे वाढदिवस साजरे करण्याकरिता जानेवारी २०२१ पासून दर महिन्याच्य शेवटच्या रविवारी सर्व कार्यकारिणी सदस्यांना अध्यक्ष्यांच्या तर्फे पत्राद्वारे व व्हॉटसॲपवर सभेची नोटीस पाठविली जाते. समाजाचे आजमितीस ५०० अधिकृत सभासद असून ते सर्व विभागवार व्हॉटसॲप नंबरने अध्यक्ष्यांशी जोडले आहेत. अशी ही ३९ कार्यकारिणी सदस्य असणारी महाराष्ट्रातील एकमेव स्थानिक समाज संस्था असेल असे मत अध्यक्ष श्री.मानकर यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले तसेच पुढील नामसूची २०२४-२५ साली प्रकाशित होईल.

यावेळी श्री.सुधाकर वाळके, श्री.दत्तात्रय चिल्लाळ, श्री.बन्सीलाल उरफाटे, श्री.गीतेश्वर भागवत, श्री.रमेश गायकवाड, श्री.शंकर सव्वाशेर, श्री.विजय जंत्रे, श्री.प्रभाकर पिसे, श्री.विजय बिचकर, किशोर मानकर, श्री.शशिकांत टपळे, श्री.कुंदन एडके, श्री.विघ्नेश सातपुते व श्रीमती शकुंतला अष्टेकर आणि मंगला दळवी या कार्यकारिणी सदस्या उपस्थित होत्या. समाजाचे अध्यक्ष श्री.मानकर सर यांनी महाराष्ट्रातील सर्व स्वकुळ साळी समाजाचे अध्यक्षांना समाजाची नामसूची मोफत पोस्टाने पाठविण्याचे जाहीर केले. तरी कृपया फक्त जिल्हा अध्यक्षांनी आपले पुर्ण नाव, पत्ता, पिनकोड व मो. नंबरसह (शुध्द मराठीत) सरांच्या व्हॉटसॲप नंबरवर ९८६०४०४२४४ पाठवावेत. सहाय्यक सचिव श्री.सचिन मधुकर जयदेवकर यांनी सुत्र संचालन केले. उपाध्यक्ष श्री.मुकुंद तुकाराम साळी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

वृत्तांकन : श्री.नाथा मानकर सर(मा.प्राचार्य)

मो.नं.: ९८६०४०४२४४

उपवर मुलींची नावे

१) कु. स्नेहल

ज. ता. १४/५/९६,
ज. वेळः रात्री ८.०५
ज. स्थळः मुंबई

रासः मीन, नाडीः अंत्य, नक्षत्रः रेवती,
गणः देव, चरणः ३रे, उंचीः ५'३'',
रक्तगटः AB+, वर्णः गव्हाळ, शिक्षण : B.Com, MMS in HR, LLB (2nd year)
नोकरीः खाजगी कंपनीत, मुंबई
अपेक्षाः सुशिक्षित, मुंबई स्थळांना प्राधान्य
पत्ताः **श्री. दिलीप रामचंद्र जठार**
वर्धमान सोसायटी, प्लॉट नं. २७६, फ्लॅट नं. ३०३, ३रा मजला, बँक ऑफ महाराष्ट्र जवळ, चारकोप, कांदिवली (पश्चिम) मुंबई-६७
मोबा.: ९८३३८८०१४९/९८१९११३०२७
-(०६/२१)

२) कु. अनामिका

ज. ता. ०२/१/९०,
ज.वेळः रात्रौ ८.१०
ज. स्थळः भांडूप

रास : कुंभ, नक्षत्र : पू. भाद्र, नाडीः आद्य,
गण : मनुष्य, चरणः३रे, उंचीः ४'११'', वर्णः गोरी
शिक्षणः HSC, INTERIOR DESIGNER DIPLOMA
नोकरीः इंटेरिअर डिझायनर, माहिम
अपेक्षा- ग्रॅज्युएट, निर्व्यसनी, कायम नोकरी, स्वतःचे घर
पत्ता : **श्री. विलास दत्तात्रय घाटे,**
१११/१, गणेश अपार्टमेंट, मानपाडा रोड, सागाव, डोंबिवली (पूर्व) ४२१२०१
मो.: 08097320698 / 08691979446 -(१/२२)
Email : ghateanamika290@gmail.com

३) कु. सिध्दी

ज. ता. ०२/१२/९७,
ज.वेळः पहाटे ३.३०
ज. स्थळः नाशिक

सौम्य मंगळ आहे
रासः धनु, नक्षत्र : मुळ (शांती केली आहे),
चरणः ३रे, गण : राक्षस, नाडीः आद्य,
उंचीः ५'२'', रक्तगटः O+,
शिक्षणः बी. कॉम.
अपेक्षाः अनुरुप, नाशिक-मुंबई स्थळांना प्राधान्य
पत्ता : **श्री. परिक्षित सुरेश बिडकर,**
घर नं.८५७, बागडपट्टी, अहमदनगर
मोबा.: ९४२२०८३८२१
९४२२७२७४६५/९५६१००४६४३
९८५०८५६६६२ (श्रीकांत शेरे-मामा) (७/२१)

४) कु. प्रेरणा
